**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत कुशल भागावरील (साधनसामुग्री वरील) खर्च भागविण्यासाठी यंत्रणांना अग्रिम निधी देण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग**
**शासन निर्णय क्र. मग्रारो-२०१०/ प्र.क्र. २/ रोहयो- १० अ**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२**
**दिनांक - १ डिसेंबर, २०११**

**वाचा :- शासन निर्णय क्र. मग्रारो २०१०/ प्र.क्र. २/ रोहयो- १० अ, दि. १३/१०/२०११**

**प्रस्तावना :**

वरील शासन निर्णयाद्वारे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत कुशल भागावरील खर्च भागविण्यासाठी ग्रामपंचायतींना व यंत्रणांना अग्रिम निधी उपलब्ध करुन देण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत. सदर शासन निर्णयाच्या परि. ३ नूसार मग्रारोहयो अंतर्गत कुशल कामाच्या २५% इतका अग्रिम निधी यंत्रणांना उपलब्ध करुन देण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत.

सदर २५% अग्रिम निधी देण्याचे आदेश असले तरी, रोपवाटीका तयार करणे, वृक्ष लागवड व फळझाड लागवड या कामांसाठी पॉलिथिन पिशव्या व अन्य साधनसामुग्री खरेदी करण्यास कुशल कामाच्या २५% अग्रिम निधी पुरेसा नसून त्यामध्ये वाढ करण्याची मागणी वन विभाग व अन्य यंत्रणांकडून होत आहे.

**शासन निर्णय :-**

कुशल कामे करताना साधनसामुग्रीवरील खर्च भागविण्यासाठी या खर्चाच्या २५% अग्रिम निधी मध्ये वाढ करण्यासंदर्भात यंत्रणांकडून होत असलेल्या मागणीबाबत काळजीपूर्वक तपासणी करुन रोपवाटीकेच्या कामांसाठी सर्व संबंधीत यंत्रणांना (वन, सामाजिक वनीकरण, कृषी, जलसंपदा, सार्वजनिक बांधकाम विभाग इ.) दिल्या जाणाऱ्या अग्रिम निधीमध्ये वाढ करुन साधनसामुग्रीवरील खर्चाच्या ५०% अग्रिम खालील अटींच्या अधिन राहून संबंधित यंत्रणांना देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

१. सदरहू अग्रिम निधी हा फक्त रोपवाटीकांच्या कामासाठी दिला जाईल.

२. रोपवाटीकेच्या कामातील कुशल भागाच्या (साधनसामुग्रीच्या) ५०% मर्यादेतच अग्रिम निधी देण्यात येईल.

३. केंद्र शासनाकडून निधी उपलब्धते अभावी बऱ्याच जिल्ह्यात रक्कम / निधी बाबत अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. अश्यावेळी निधी उपलब्धतेबाबत तपासणी

करुन जिल्हाधिकारी यांनी अग्रिम निधी देण्याबाबत निर्णय घ्यावा. कोणत्याही परिस्थितीत अग्रिम निधी दिल्यानंतर मजूरी प्रदानासाठी निधी उपलब्ध नाही अशी परिस्थिती उद्‌भवू नये याची दक्षता जिल्हाधिकारी यांनी घ्यावी.

४. अग्रिम निधी तहसिलदारामार्फतच उपलब्ध करुन द्यावा. संबंधित यंत्रणांनी सदर अग्रिमाच्या खर्चाचा हिशेब देणे कोणत्याही परिस्थितीत एक महिन्यापेक्षा जास्त कालावधीसाठी प्रलंबित ठेऊ नये तसेच खर्चाचा हिशेब त्वरीत देवून MIS वर सदर खर्चाची नोंद करावी

५. वरील अटींव्यतिरिक्त जिल्हाधिकारी त्यांना योग्य वाटतील अशा अन्य अटी घालू शकतील.

वरील प्रमाणे ५०% अग्रिम निधी खर्च करण्याच्या संदर्भात तसेच त्याची प्रतिपूर्ती करुन पुढील निधी उपलब्ध करुन घेण्याच्या संदर्भात अन्य सर्व सूचना वाचा येथील शासन निर्णयाप्रमाणेच राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**प्रधान सचिव (रोहयो)**

प्रती,

१) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे स्वीय सहायक,
२) प्रधान सचिव (वने), महसुल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई-४०००३२
३) प्रधान सचिव, (कृषी) कृषी व पदुम विभाग, मंत्रालय,मुंबई-४०००३२
४) प्रधान सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय,मुंबई-४०००३२
५) प्रधान सचिव, सार्वजनीक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२
६) प्रधान सचिव, (कृषी) कृषी व पदुम विभाग, मंत्रालय,मुंबई-४०००३२
७) सर्व विभागीय आयुक्त,
८) प्रधान मुख्य वन संरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
९) आयुक्त, कृषी, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०) सर्व जिल्हाधिकारी, (मुंबई व मुंबई उपनगर वगळून)
११) संचालक, फलोत्पादन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२) मुख्य अभियंता व सह सचिव (रोहयो)
१३) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
१४) सर्व उप जिल्हाधिकारी (रोहयो)
१५) मुख्य अभियंता,लघुपाटबंधारे विभाग (स्थानिक स्तर), पुणे.
१६) सर्व विभागीय कृषी सहसंचालक,
१७) समिती अधिकारी, रोजगार हमी योजना समिती महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई-४०००३२

१८) सर्व उपसचिव/ अवर सचिव/कक्ष अधिकारी,(मग्रारोहयो) नियोजन विभाग,मंत्रालय,
१९) कक्ष अधिकारी, रोहयो-१, सारसंग्रह
२०) निवड नस्ती,कार्यासन रोहयो-१० अ,नियोजन विभाग,मंत्रालय,मुंबई-३२.